# मेट्रो ३ मार्गिकेवरील दुसरी गाडी सज्ज

## आंध्र प्रदेशमधून गाडी लवकरच मुंबईत दाखल होणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**



### मेट्रोची वैशिष्ट्ये

- आठ डब्यांची गाडी
- १८० मीटर लांब गाडी
- ३.२ मीटर रुंद गाडी
- एकूण प्रवाशी क्षमता २४००
- वेग ताशी ८५ किमी
- स्टेनलेस स्टीलचा वापर
- ३० टक्के विद्युत उर्जेची बचत

**मुंबई :** 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' मार्गिकेवर पहिल्या टप्प्यात नऊ गाड्या चालविण्यात येणार असून यापैकी एक गाडी यापूर्वीच आंध्र प्रदेशातील श्रीसिटीवरून मुंबईत दाखल झाली आहे. सध्या दुसरी गाडी तयार झाली असून ही गाडी लवकरच मुंबईत आणण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे (एमएमआरसी) नियोजन सुरू आहे.

'मेट्रो ३' मार्गिका दोन टप्प्यात सुरू करण्यात येणार आहे. बीकेसी-सीप्झ हा टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करण्यात येणार आहे. याअनुषंगाने एमएमआरसीने कामाला वेग दिला आहे. वर्षभरात 'मेट्रो ३' सेवा सुरू करण्यात येणार असून या मार्गावर धावणाऱ्या मेट्रो गाड्या मुंबईत आणून त्यांची जोडणी आणि चाचणी करणे गरजेचे आहे. त्यामुळे मेट्रो गाड्या मुंबईत आणण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. दरम्यान, 'मेट्रो ३'मधील कारशेडचा प्रश्न सुटत नसल्याने मेट्रो गाड्या ठेवयच्या कुठे असा प्रश्न निर्माण झाला होता. पण आता कारशेडचा प्रश्नही मार्गी लागला असून कारशेड काम वेगाने पूर्ण करण्याचा एमएमआरसीचा प्रयत्न आहे.

एमएमआरसीने 'मेट्रो ३' मार्गिकेसाठी ३१ गाड्यांची बांधणी करण्याचे कंत्राट श्रीसिटीतील एका कंपनीला २०१७-२०१८ मध्ये दिले आहे. सुमारे २,५१६ कोटी रुपयांचे हे कंत्राट आहे. या कंत्राटानुसार श्रीसिटीत 'मेट्रो ३'च्या गाड्यांची बांधणी सुरू आहे. श्रीसिटीतून पहिली गाडी यापूर्वीच मुंबईत आली असून आता दुसरी गाडी मुंबईत येण्यासाठी सज्ज झाल्याची माहिती एमएमआरसीमधील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. ही गाडी ठेवण्यासाठी जागेचे नियोजन करण्यात येत आहे. ते झाले की तात्काळ गाडी मुंबईत आणण्यात येईल, असेही ते म्हणाले. दरम्यान, पहिल्या टप्प्यात नऊ गाड्या धावणार आहेत. त्यामुळे आता आठ गाड्या टप्प्याटप्याने मुंबईत आणण्याचा एमएमआरसीचा मानस आहे.